

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे संपर्क – ७०८३७०५१७८/९४२०२२४३४१

।। श्री विठ्ठल ।।

श्रीक्षेत्र भामचंद्र डोंगर

प्रति,

दि. / /२०१२

सन्माननिय व आदरणिय,

ह.भ.प.श्री — — — — — — — — — — — — — — — — — — — — —

— — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — — यांस रामकृष्ण हरि शिरसाष्टांग दंडवत !

महोदय,

तीर्थक्षेत्र देहू-आळंदी, भंडारा-भामचंद्र-घोऱ्हाडेश्वर पंचक्रोशी परिसर ही महाराष्ट्रातील पवित्र अध्यात्मिक भूमी आहे आणि ती तुम्हां-आम्हां सर्व वारकरी व भाविकांचे स्फूर्तिस्थान आहे, **मात्र सन २००७ मध्ये श्री क्षेत्र भामचंद्र डोंगराला खाणी लावून या संत भूमीची प्रतारणा करुन 'डाऊ' सारख्या घातक रसायन ओकणाऱ्या कंपन्या येथे आणण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला.** त्या विरोधात माझ्यासारख्याने आवाज उठविताच देहू-आळंदी संस्थानसह आपण सर्व वारकरी सांप्रदायिक भक्त व संस्थांनी एकत्र येऊन एकदिलाने यशस्वी लढा दिला त्यामुळे या विषारी कंपनीचा परवाना रद्द करुन तीला या मंगलमय संतभूमीतून हद्दपार करण्यास सरकारला भाग पाडले.

'डाऊ' गेल्यामुळे आपणां सर्वांना असे वाटले की, 'देहू-आळंदी' परिसराचे पावित्र्य व 'भामचंद्र-भंडारा डोंगरा' चे अखंडत्व व साधकांचा येथील एकांत कायम राखण्यात आपण यशस्वी झालो, **परंतु 'डाऊ' घालविण्याचा राग मनात धरुन की काय.. सरकारने येथील व्यावसायिक व खाण उद्योजकांशी आतून कांही व्यवहार करुन एम.आय.डी.सी.च्या नावाखाली त्यांचे मार्फतच संत तुकोबांची तपोभूमी भंडारा-भामचंद्र डोंगर ही संतपीठे हळुहळु उध्वस्त करण्याचा पुन्हा प्रयत्न चालवला आहे.**

या विरोधात आपण सर्वांनी पुन्हा एकत्र येऊन एकदिलाने आवाज उठविला नाही तर नजिकच्या काळात शासनाद्वारे बिल्डर लॉबीच्या माध्यमातून संपूर्ण भामचंद्र आणि भंडारा डोंगर ही ध्यानकेंद्रे भुईसपाट झाल्याशिवाय राहणार नाहीत. **कारण सरकारने सन २०११ मध्ये हे दोन्ही पूर्ण डोंगर "*जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांचे राज्य संरक्षित स्मारक*" म्हणून घोषित करण्यावर यानी व एम.आय.डी.सी. ने हरकती घेतल्या आहेत. तसेच येथील स्थानिक नेत्यांच्या माध्यमातून सरकार दरबारी संबंधित पुरातत्त्व विभागावर दबाव टाकून येथे विध्वंसक काम चालूच आहे. भ्रष्ट राजकीय बिल्डरांच्या घशात आज हे डोंगर आहेत.**

तेव्हां या संदर्भात प्रबोधन करुन व माहिती देवून आंदोलनाचे पुढचे पाऊल टाकण्याची रुपरेषा ठरविण्यासाठी व त्याबाबत श्रध्दावंतांशी संवाद साधण्यासाठी आम्ही महाराष्ट्रव्यापी दौऱ्याचे आयोजन केले आहे. त्या दौऱ्यांतर्गत प्रत्येक भागात जिल्हा, तालुका, गांव पातळीवर सभा व बैठका घेण्याचे ठरविले आहे. तरी यातून बैठकीचे स्थान निश्चित करुन परिसरातील सर्व सहकाऱ्यांना तसे कळविण्यासाठी व या चिंतन बैठकीस उपस्थित राहून संतभूमि संरक्षणाच्या कार्यास सर्वांचा मोलाचा हातभार लागावा आणि **तुकोबांचे पाईक या नात्याने त्यांच्या ऋणातून उत्तीर्ण होण्यास्तव दैवयोगाने प्राप्त झालेला हा "*रात्रंदिन आम्हां युध्दाचा प्रसंग ।।*" अशा संघर्षाच्या कर्तव्यपूर्तीने तुमचे आमचे जीवन धन्य व्हावे...!** म्हणून नियोजनासाठी .........

आपण आपल्या कार्यक्रमांतर्गत जिल्हा, तालुका, गांव पातळीवरील संपर्कातून जोडलेल्या सर्व किर्तनकार, प्रवचनकार, भाविक, भजनी मंडळींचे पत्रव्यवहाराचे पूर्ण पत्ते (फोन नंबरसह) संकलीत करुन त्या कागदांच्या प्रती कृपया

***पत्रव्यवहाराचा पत्ता***

*विभागीय कार्यालय :-*
**संतभूमी संरक्षक संघर्ष समिती,**
सूर्यभानजी पिंपळे स्मृतीभवन, अलंकापुरीनगर,
आळंदी-देव, ता. खेड, जि. पुणे-४१२ १०५

या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवून देण्याची संतकार्यासाठी तसदी घ्यावी, ही नम्र विनंती. या संतभूमी संरक्षक संघर्ष समितीच्या अभियानात आपण आमचेबरोबर पहिल्यापासून आहात ही खूणगाठ बांधूनच "***एकमेका साह्य करु । अवघे धरु सुपंथ ।।***" या जगद्‌गुरुंच्या अभंग वचनाला अनुसरुन "***अहंकाराचा वारा न लागो.... ।।***" *अशा प्रार्थनेत* आम्ही वाटचाल करित आहोत... हा विश्वास !

आपले विश्वासू,

**संतसेवक प्रवक्ते श्री. गजानन महाराज पिंपळे**
कार्याध्यक्ष मो. ९८५०४२९८०९

**हरिभक्त श्री. मधुसूदन महाराज पाटील**
संस्थापक-अध्यक्ष